admn 18-19


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

आयएस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER
कृषि परिषद

MCAER कृषि परिषद
२००८-२००९

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com
संकेतस्थळ : www.mcaer.org

दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.
फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१३८४

दि.१८ जून,२०१८

## परिपत्रक

**विषय:- पदवी प्रवेश प्रक्रिया २०१८-१९ अंतर्गत जात वैधता प्रमाणपत्र दाखल करण्याबाबत.**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत बी.एस्सी. (ऑनर्स) (कृषी), बी.एस्सी. (ऑनर्स) (उद्यानविद्या), बी.एस्सी. (ऑनर्स) (वनविद्या), बी. टेक्. (कृषी अभियांत्रिकी), बी. टेक्. (अन्नतंत्रज्ञान), बी. एस्सी. (ऑनर्स) (सामाजिक विज्ञान) आणि बी. टेक. (जैवतंत्रज्ञान) हया व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या नियंत्रणाखाली दि. ११ जून,२०१८ पासून ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेऊन सदर प्रवेश प्रक्रियेंतर्गत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र अनिवार्य करण्यात आलेले आहे. ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करण्याचा अंतिम दि.५/७/२०१८ असून दि. ६ आणि ७ जुलै,२०१८ हया दोन दिवसांच्या कालावधीत विलंब शुल्कासह प्रवेश अर्ज दाखल करता येतील.

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि. १५ जून,२०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये जात वैधता प्रमाणपत्रासंदर्भात दिलेल्या सूचना विचारात घेता, प्रवेश अर्ज दाखल करतेवेळी जात वैधता प्रमाणपत्र उमेदवाराकडे उपलब्ध नसल्यास, दि.१४ ते १७ जुलै,२०१८ या तक्रार नोंदणीच्या कालावधीत उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र त्यांच्या लॉगइनद्वारे दाखल करता येईल.

यास्तव वरील प्रवर्गाच्या उमेदवारांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी जात प्रमाणपत्राची स्कॅन केलेली प्रत, तसेच जात वैधता प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज सादर केलेला असल्याची संबंधित कार्यालयाची पावती, प्रवेश अर्ज दाखल करतेवेळी अपलोड करावी. ज्या उमेदवारांनी यापूर्वीच प्रवेश अर्ज दाखल केलेले आहेत, अशा उमेदवारांना त्यांच्या लॉगइनमध्ये उक्त

पावती अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अशा प्रवेश अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांनी त्यांच्या लॉगइनद्वारे सदर पावती अपलोड करावी.

जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर दि. १४ ते १७ जुलै,२०१८ या कालावधीत सदर प्रमाणपत्र लॉगइनद्वारे अपलोड करावे. या कालावधीतही जात वैधता प्रमाणपत्र दाखल न केल्यास अशा उमेदवारांना सर्वसाधारण प्रवर्ग लागू करण्यात येईल, याची सर्व संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(रविंद्र जगताप) भा प्र से
महासंचालक

प्रत:-

१. मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे ४११ ०१९.
   यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.
२. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., तिसरा मजला, गोपाळ हाऊस, हॉटेल किमयाजवळ, कर्वे रोड, कोथरुड, पुणे ४११ ०२९.
   यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक त्यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे व त्यानुसार उमेदवारांच्या लॉगइनमध्ये योग्य ती व्यवस्था करावी.
३. मा. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, यांना माहितीस्तव सविनय सादर...